का.प्रा.वि./आयसीडी/२०१८-१९/२८९
दि. २८/१/२०१९

(2)

# मुंबई विद्यापीठ

मसुदा
क्र.६/२०१८-१९

गोपनीय
व्यवस्थापन परिषद

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०१८-१९ मधील दि. २७ नोव्हेंबर,२०१८ रोजी झालेल्या सहाव्या सभेचे सभाइतिवृत्त

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०१८-१९ मधील सहावी सभा **मंगळवार, २७ नोव्हेंबर, २०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित केलेली सभा स्थगित होऊन शुक्रवार दि. ७ डिसेंबर, २०१८ रोजी दुपारी २ वाजता सर फिरोजशहा मेहता, व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२** येथे संपन्न झाली. सभेमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. सुहास पेडणेकर (कुलगुरू) | अध्यक्ष |
| २. | प्रा. रविंद्र कुलकर्णी (प्र-कुलगुरू) | सदस्य |
| ३. | श्री. दिपककुमार मुकादम | सदस्य |
| ४. | प्रा. बि.एन.जगताप | सदस्य |
| ५. | डॉ. अभय वाघ (संचालक तंत्र शिक्षण संचानालय) | सदस्य |
| ६. | प्रा. (श्रीमती) रश्मी ओझा | सदस्या |
| ७. | प्रा. डॉ. गौतम गवळी | सदस्य |
| ८. | प्रा. डॉ. अजय भामरे | सदस्य |
| ९. | डॉ. महादाप्पा गं. गोंडा | सदस्य |
| १०. | प्रा. डॉ. वैभव नरवडे | सदस्य |
| ११. | प्रा. डॉ. रविकांत सांगुर्डे | सदस्य |
| १२. | ॲड. निल हेळेकर | सदस्य |
| १३. | डॉ. सुभाष वाघमारे | सदस्य |
| १४. | श्री. प्रदीप सावंत | सदस्य |
| १५. | श्री. राजन कोळंबेकर | सदस्य |
| १६. | प्रा. सुनिल भिरूड (प्र-कुलसचिव) | सदस्य सचिव |
| १७. | श्री. संजय शाह (प्र-वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित |
| १८. | डॉ. अर्जून घाटुळे (प्र-संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ ) | निमंत्रित |

➢ **अनुपस्थिती :-**

सदर सभेस खालीस सदस्य अनुपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. मुरलीधर कुऱ्हाडे | सदस्य |
| २. | संचालक, उच्च शिक्षण, संचालनालय | सदस्य |
| ३. | सचिव, उच्च शिक्षण विभाग | सदस्य |

| बाब क्र | व्यवस्थापन परिषदेची बाब व ठराव |
|---|---|
| | (आस्थापना विभाग १/३) |
| बाब क्र.७ | **CAG यांचा अहवाल क्र. SSII (LAP-MU/A.M.No. 46 Dt. 10/08/2017) नुसार रत्नागिरी उपकेंद्रातील कर्मचारी वर्गास अतिप्रदान केलेले घरभाडे भत्ता, शहर पूरक भत्ता व वाहतूक भत्ता यांची वसूली करणेबाबत.** |
| ठराव क्र.७ | बाब क्र. ७ नुसार असा ठराव करण्यात आला की, रत्नागिरी उपकेंद्रातील कर्मचारी वर्गास प्रदान केलेला घरभाडे भत्ता, शहर पुरक भत्ता, वाहतूक भत्ता वसुली बाबत कंट्रोलर व ऑडीटर जनरल (CAG) यांच्या अहवालाप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत कायदेशिर सल्ला तसेच सदर बाब सादर करायला एवढा उशिर का झाला? विद्यापीठ निधीतून देणे ठरले असताना शासनाकडून पैसे कसे मागविले, व्यवस्थापन परिषदेचा निर्णय कोणत्या निकषावर झाला,याच्या माहितीसह बाब पुन:श्च सादर करण्यात यावी व पुढे ठराव करण्यात आला की, रत्नागिरी उपकेंद्रातील कर्मचाऱ्यांना हे भत्ते मुंबई शहराप्रमाण न देता रत्नागिरी शहराप्रमाणे देय करावेत. |
| | ~~(क्रीडा विभाग)~~ (विद्यापीठ क्रिडा संकुल) |
| बाब क्र.८ | **To take disciplinary action against the players of Mumbai University Cricket Team.** |
| ठराव क्र.८ | बाब क्र. ८ नुसार सखोल चर्चेनंतर असा ठराव करण्यात आला की, विद्यार्थी हा विद्यापीठाचा केंद्रबिंदू असल्याने त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्याआधी विद्यापीठाने त्यांच्यासोबत सही करार केला होता काय? जे विद्यार्थी विद्यापीठातर्फे स्पर्धेत भाग घेऊ शकले नाहीत त्यांच्या अडचणी काय होत्या? कार्यवाही करण्याआधी त्यांना ताकीद दिली होती काय?; त्यांना कारणे दाखवा नोटीस दिली होती काय? एखादया विद्यार्थ्याने अगोदरच कळविले आहे का? इत्यादी सर्व बाबींची मुंबई विद्यापीठाच्या टुर्नामेंट समितीने संपुर्ण तपासणी करावी व सर्व विद्यार्थ्यांना आणि टिमच्या व्यवस्थापनास टुर्नामेंट समितीने त्यांची बाजु मांडण्याची संधी दयावी व अहवाल सादर करावा. |
| | (संलग्नता विभाग) |
| बाब क्र.९ | **Autonomous Status to the Shri. Vile Parle Kelavani Mandal's Narsee Monjee College of Commerce & Economics, Juhu Development Scheme, Vile Parle (West), Mumbai-400 056 under section 122 of the Maharashtra Public Universities Act, 2016 regarding grant of Autonomous tatus to Affiliated Colleges.** |
| ठराव क्र.९ | बाब क्र. ९ नुसार सखोल चर्चेनंतर असा ठराव करण्यात आला की, एन. एम. महाविद्यालयाने संलग्नता व अन्य प्रकारचे विद्यापीठाचे |

| | |
|---|---|
| | शुल्क जमा केले आहे काय ते तपासावे व महाविद्यालय स्थापनेच्या वर्षापासून "नो डयुज सर्टीफीकेट" सह प्रस्ताव पुन्हा सादर करावा. |
| | **(आस्थापना विभाग २/४)** |
| **बाब क्र.१०** | **श्री. सुभाष नवाले, सिस्टिम प्रोग्रॅमर (तात्पुरते), दूर व मुक्त अध्ययन संस्था यांच्याबाबत चौकशी अधिकारी यांनी सादर केलेल्या रिपोर्टबाबत.** |
| **ठराव क्र.१०**<br><br><br><br><br><br>* | बाब क. १० नुसार असा ठराव करण्यात आला की, दूर व मुक्त अध्ययन संस्था प्रथम सत्र, २०१५ मध्ये झालेल्या **T.Y.B.A. (Sem V) (CBSCS) (75:25)** या परिषदेच्या निकाल पत्रकात **(office ledger)** व गुणपत्रकातील त्रुटी या प्रकरणाबाबत श्री. सुभाष नवाले, सिस्टिम प्रोग्रॅमर (तात्पुरते), IDOL यांचेबाबत चौकशी अधिकारी, डॉ. अंबुजा साळगावकर यांनी सादर केलेला दि. १५ एप्रिल, २०१८ चा अहवाल संदिग्ध असल्यामुळे व समितीला कोणती ही मुदतवाढ दिली नसताना उशिरा सादर केला असल्याने फेटाळण्यात आला.<br>पुढे असाही ठराव करण्यात आला की, पुन्हा नव्याने चौकशी समिती स्थापन करुन नव्याने चौकशी करण्यात यावी व चौकशी समितीने तातडीने अहवाल सादर करण्यात यावा. |
| | **(संलग्नता विभाग)** |
| **बाब क्र.११** | **महाराष्ट्र शासन पत्र क. संकीर्ण-२०१६/(१९१/१६)मशि-४, दिनांक ३१ जुलै, २०१७ नुसार शिवाजीराव जोंधळे इन्स्टिटयुट ऑफ लॉ ॲन्ड रिसर्च बाबत तकारी संबंधी गठीत केलेल्या सत्य शोधक समितीचा अहवाल.** |
| **ठराव क्र.११** | बाब क. ११ नुसार याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर चर्चेमध्ये ॲड. निल हेळेकर, श्री. दिपककुमार मुकादम, डॉ. अभय वाघ, प्रा.बि.एन.जगताप, डॉ. अजय भामरे, डॉ. महादप्पा गोंडा, श्री. प्रदीप सावंत, डॉ. रश्मी ओझा यांनी सदर चर्चेत सहभाग घेतला. डॉ. अभय वाघ यांनी त्यांचे मत देताना स्पष्ट केले की, दंड लावण्याची कारवाई ही न्यायालयीन कार्यवाही असते. एकाच वेळी कारणे दाखवा नोटीस व दंड लावण्याची कार्यवाही करता येत नाही. डॉ. अभय वाघ यांनी सदर निर्णयाबद्दल त्यांचा आक्षेप नोंदविला.<br>महाविद्यालयांना दंड आकारण्याचे निकष ठरविण्यात यावे तसेच निकष ठरविण्याकरिता विद्यापीठाचे धोरण असायला हवे. तसे धोरण नसल्यास सदर आकरलेल्या दंडाच्या रक्कमेबाबत श्री. सांगुर्डे यांनी आक्षेप |

| | |
|---|---|
| | नोंदविला.<br><br>सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला :—<br>१) महाराष्ट्र शासनाने पत्र क. संकीर्ण - २०१६/(१९१/१६)/ मशि-४, दि. ३१ जुलै, २०१७ च्या अन्वये शिवाजीराव जोंधळे इन्सिटटयुट ऑफ लॉ ॲन्ड रिसर्च या महाविद्यालयाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने गठित करण्यात आलेल्या प्रा. गडदे यांच्या समितीने दिलेला अहवाल व पुर्नविलोकनासाठी गठित केलेल्या डॉ. विजय जोशी यांचे समितीने दिलेला अहवाल मान्य करण्यात आला.<br>२) शिवाजीराव जोंधळे इन्स्टिटयुट ऑफ लॉ ॲन्ड रिसर्च यांचे संलग्नीकरण का काढण्यात येवू नये, यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या तरतुदींचे पालन करून कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी.<br>३) तसेच सदर महाविद्यालयाला विद्यापीठामार्फत शासनास प्रस्ताव सादर करताना उचित कागदपत्र सादर न केल्याबद्दल रू. १० लाख चा दंड आकारण्यात यावा.<br>४) दोन्ही समितीचे अहवाल व विद्यापीठाने केलेली कार्यवाही शासनास अवगत करण्यात यावी. |
| | **(शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग (वि.शि))** |
| **बाब क्र.१२** | **डॉ. (श्रीमती) अनुराधा मिश्रा व डॉ. प्रेमसागर विवेक यांना Sabbatical Leave च्या कालावधीतील दिलेल्या वेतनासंबंधी निर्णय घेण्याबाबत.** |
| **ठराव क्र.१२** | प्रा. जगताप यांनी सांगितले की, डॉ. प्रेमसागर विवके हे महात्मा गांधी विद्यापीठ, मॉरीशस येथे गेले होते, ज्या विद्यापीठाचे मानाकंन कमी आहे. अशा विद्यापीठामध्ये जावून आपण विद्यापीठाचे पैसे खर्च का करावे? या बाबत नियम बनविणे गरजेचे आहे.<br><br>बाब क. १२ नुसार असा ठराव करण्यात आला की, प्रा. अनुराधा मिश्रा, भौतिक शास्त्र विभाग यांना सॅबॅटिकल रजेच्या कालावधीत ०१/१२/२०१६ ते ३०/११/२०१७ या १ वर्षाच्या कालावधीकरिता देण्यात आलेली एकूण रक्कम रु.२१,७५,७६१ एक विशेष बाब म्हणून देण्यात यावी.<br>तसेच असाही ठराव करण्यात आला की, डॉ. प्रेमसागर विवेक यांना सॅबॅटिकल रजेच्या कालावधीतील सप्टेंबर २०१५ च ऑक्टोंबर २०१५ या दोन महिन्याचे एकूण विद्यापीठाने दिलेले वेतन एकूण रक्कम |

| | |
|---|---|
| | रू १,५७,२२४/- एक विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात यावी.<br><br>डॉ. अभय वाघ यांनी त्यांचे मत व्यक्त करताना स्पष्ट केले की, शासनाकडून या बाबत मार्गदर्शन आले आहे तरी विद्यापीठाचे काही दुसरे मत असेल तर त्याबाबत आपल्याला काही कळवायचे असेल तर परत शासनाला कळवल गेल पाहिजे की, सॅबॅटिकल लिव्हमुळे लोकांची प्रगती होणार आहे, पी.एच.डी. होणार आहे. शासनाने तुम्हाला स्पष्ट नाही म्हटल असेल, अशा वेळी निर्णय घेणे योग्य होत नाही.<br><br>पुढे असाही ठराव करण्यात आला की, सॅबॅटिकल रजा देण्याबाबत शासन नियमात किंवा विद्यापीठाच्या परिनियमात तरतुद नसल्याने शिक्षकांना उत्कृष्ट दर्जाचे संशोधन करता यावे व लिखान करता यावे यासाठी सुस्पष्ट मार्गदर्शक तत्वे **(Guidelines)** तयार करण्यासाठी तज्ञांची समिती गठीत करण्यात यावी.<br><br>सॅबॅटिकल रजेसंदर्भात नियमावली बनविण्यासाठी खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात आली.<br><br>१) प्र-कुलगुरू — निमंत्रक<br>२) प्रा.बि.एन. जगताप — सदस्य<br>३) डॉ. अजय भामरे — सदस्य<br>४) ॲड.निल हेळेकर — सदस्य |
| | **(शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग (वि.शि))** |
| **बाब क्र.१३** | **विद्यापीठातील विविध विभागातील शिक्षकांना आश्वासित प्रगती योजना (CAS) मधील पदोन्नती साठीच्या छाननी व मुल्यमापन समितीच्या अहवालाबाबत.** |
| **ठराव क्र.१३** | बाब क. १३ नुसार असा ठराव करण्यात आला की, आश्वासित प्रगती योजने अंतर्गत (CAS) अनुदानित व विनाअनुदानित पदांवर पदोन्नतीबाबत छाननी व मूल्यमापन समितीचा अहवालाची नोंद घेण्यात आली.<br><br>असाही ठराव करण्यात आला की, गेली कित्येक वर्षे आश्वासित प्रगती योजने अंतर्गत पदोन्नती प्रलंबित असल्याने शिक्षकांचे होत असलेले नुकसान विचारात घेता ही योजना तातडीने व अत्यंत चांगल्या प्रकारे पार पाडल्याबद्दल मा. कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव व शिक्षक नियुक्ती व मान्यता विभागातील अधिकारी/कर्मचारी यांचे अभिनंदन केले.<br>त्याचप्रमाणे स्थगन प्रस्तावाद्वारे शिक्षकांच्या (CAS) जे प्रश्न मांडून प्रशासनाचे लक्ष वेधले त्याबद्दल अधिसभा सदस्य प्रा. डॉ. वैभव नरवडे यांचेसह सर्व अधिसभा सदस्यांचे देखील अभिनंदन केले. |

| | |
|---|---|
| | **(शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग (म.शि))** ✓ |
| **बाब क्र.१६** | **महाविद्यालयीन शिक्षकांसाठी एकवेळ मान्यतेबाबत (One Time Approval) समितीच्या अहवालाबाबत.** |
| **ठराव क्र.१६** | बाब क. १६ नुसार याबाबत सविस्तर प्रस्ताव प्रा. डॉ. वैभव नरवडे यांनी सभागृहात मांडला. त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. विद्यापीठाच्या शिक्षकांच्या सेवा-शर्ती या परिनियमावर आधारीत आहे व परिनियमामध्ये "One Time Approval" असले तर ते करण्यात यावे अन्यथा परिनियमामध्ये बदल करून "One Time Approval" करण्यात यावे. कारण विद्यापीठात अनुदानित व विनाअनुदानित शिक्षकांसाठी वेगवेगळया सेवा-शर्ती नाहीत. प्रथम परिनियम ४१७ तपासून घ्यावा व बदलावा सर्वांना नियुक्तीची समान संधी देण्यात यावी. तसेच एका महाविद्यालयातून दुसऱ्या महाविद्यालयात जाताना परिनियमाप्रमाणे सर्व प्रक्रिया राबविण्यात यावी, असे मत प्रा. डॉ. रविकांत सांगुर्डे यांनी व्यक्त केले.<br><br>प्रा. बि. एन. जगताप यांनी सूचित केले की, नवीन शिक्षण पध्दतीमध्ये विद्यार्थ्यांचे केडिट ट्रान्सफर होत असतील तर शिक्षकांचे केडिट ट्रान्सफर करण्यासाठी विचार करण्यात यावा.<br><br>डॉ. अभय वाघ यांनी त्यांचे मत व्यक्त करताना स्पष्ट केले की, शिक्षकीय पदांना मान्यता देत असताना प्रथम बिंदुनामावली मान्य करावी लागते. अनुदानित आणि विनाअनुदानित हे दोन्ही बिंदू वेगवेगळे असतात. अनुदानित महाविद्यालयाचा पगार हा शासनाकडून दिला जातो. प्रत्येक महाविद्यालयासाठी Appointing Authority वेगवेगळी असते. त्यामुळे प्रथम नियुक्ती द्यावी लागते व नंतर मान्यता प्रक्रिया सुरू होते. या सर्व माहितीचा ऊहापोह करून विद्यापीठाच्या कायदयाच्या चौकटीमध्ये कसे बसवायचे याचा विचार करण्यात यावा, जेणेकरून पुढे कायदेशीर अडचणी येणार नाहीत तसेच एम.एस.बी.टी.मध्ये ऑनलाईन मान्यता प्रणाली राबविण्यात आली आहे; त्याच धर्तीवर तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यापीठामध्ये मान्यतेबाबत ऑनलाईन प्रणाली राबविण्यात येवून सर्व प्रक्रिया सुलभ करता येईल.<br><br>याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली व असा ठराव करण्यात आला की, यासंदर्भात तांत्रिक व कायदेशीर बाबी तपासणीकरिता डॉ. रश्मी ओझा, ॲड. निल हेळेकर व ॲड. महेश शुक्ला, मानद् विधी सल्लागार यांची समिती गठित करण्यात यावी व सदर समितीने "one time approval" अहवालवरील तांत्रिक, आर्थिक व कायदेशीर बाबी तपासून तसेच हे सर्व डिजिटल फॉरमॅटमध्ये कसे तयार करण्यात येईल. याबाबतचा अहवाल एका महिन्यात सादर करावा. सदर अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.<br><br>श्री. मुकादम यांनी ही "one time approval" संकल्पना चांगली आहे परंतु विद्यापीठ मान्यतेकरिता नेमके काय तपासते याबद्दल माहिती विचारली; |

| | |
|---|---|
| | सद्यस्थितीत विद्यापीठाकडे संचालक, प्राचार्य, शिक्षक इ. यांचे किती ॲप्रुव्हल प्रलंबित आहे, याची सविस्तर माहिती देण्यात यावी, अशी मागणी केली असता, ती मान्य करण्यात आली. |
| | **(संलग्नता व मान्यता विभाग)** |
| बाब क्र.२० | **विश्वविद्यालय अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्याकडून एन. एस. क्यु. एफ (National Skill Qualification Framework) यांच्यामार्फत बी. व्होक. व एम. व्होक. अभ्यासक्रमांना मान्यता देण्यात आलेल्या महाविद्यालयांचे प्रस्ताव शासनास पाठविण्याचा मान्यता देण्याबाबत.** |
| ठराव क्र.२० | बाब क्र. १६ नुसार सविस्तर चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की, खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात यावी.<br>१. डॉ. अजय भामरे (निमंत्रक)<br>२. डॉ. मुरलीधर कुऱ्हाडे (सदस्य)<br>३. डॉ. रश्मी ओझा (सदस्य)<br>४. डॉ. सुरेश उकरंडे (सदस्य)<br>५. सौ. पुष्पा मोरे, पुणे विद्यापीठ (सदस्य)<br>सदर समितीने बी.व्होक व एम.व्होक, पीएच.डी. अभ्यासक्रमांना अभ्यासमंडळाची मान्यता, अभ्यासक्रमांना आकाराव्यात येणा-या संलग्नता शुल्क, अभ्यासक्रमांचे शुल्क, विद्यार्थी संख्या यांचा सविस्तर अभ्यास करुन पंधरा दिवसांत अहवाल सादर करण्यात यावा. तसेच विद्यापीठातील इतर महाविद्यालयात किती/कोणते बी.व्होक व एम.व्होक अभ्यासक्रम चालतात याचीही माहीती व त्या महाविद्यालयातील यासंबधात विद्यार्थ्यांचे असलेले प्रश्न,अभ्यासक्रमासाठी सध्या आकारण्यात आलेले शिक्षण शुल्क, विद्यार्थी संख्या, अभ्यासक्रमांस अभ्यासमंडाळाची मान्यता, आकारण्यात आलेले संलग्नता शुल्क, याचीही तपासणी करुन १५ दिवसांत अहवाल सादर करावा. |
| | **(संलग्नता व मान्यता विभाग)** |
| बाब क्र.२१ | **Report of the Local Inquiry Committee for Temporary Shifting i.e. 36 months of National Centre for Rural Development's Sterling College of Arts, Commerce & Science from "Plot no. 43, Sector-19, Nerul, Navi Mumbai- 400 706" to "Plot No.93, Sector-19, Nerul, Navi Mumbai- 400 706".** |
| ठराव क्र.२१<br>* | बाब क्र. २१ नुसार असा ठराव करण्यात आला की, स्थानिक चौकशी समितीचा (LIC) अहवाल स्विकारण्यात येऊन नॅशनल सेंटर फॉर रूरल डेव्हलपमेंट संस्थेंचे स्टर्लिंग कॉलेज ऑफ आर्टस् कॉमर्स ॲन्ड सायन्स चे तात्पुरते स्थलांतर (३६ महिन्यांसाठी) प्लॉट क्र. ९३, सेक्टर-१९, |

| | |
|---|---|
| | नेरूळ, नवी मुंबई येथून प्लॉट क्र. ९३, सेक्टर १९, नेरूळ, नवी मुंबई येथे करण्यास मान्यता देण्यात आली. |
| बाब क्र.२२<br>ठराव क्र.२२ | ~~(विधी कक्ष)~~ (मानद विधी सल्लागार)<br>**For revising the rates of fees to be paid to the panel advocates.**<br>बाब क्र. २२ नुसार विद्यापीठातील कायदेशीर प्रकरणे न्यायालयत हाताळण्यासाठी वकीलांच्या पॅनलकरिता विविध प्रकारचे सुधारीत शुल्क (सोबत जोडलेल्या परिशिष्ट -'क' प्रमाणे) मान्य करण्यात आले.<br>असाही ठराव करण्यात आला की, कोणत्याही न्यायालयीन प्रकरणात विद्यापीठातर्फे वकिलांची नेमणुक करताना आवश्यकता भासल्यास ॲड. हेळेकर व डॉ. रश्मी ओझा यांनी कुलगुरूंना मदत करावी. |

**आयत्या वेळी आलेल्या विषयांवर खालीलप्रमाणे सविस्तर चर्चा झाली व खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आले.**

१) असा ठराव करण्यात आला की, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी असलेली गटविमा योजनांचा कालावधी सप्टेंबर, २०१८ रोजी संपुष्टात आल्याने वेळेचे बंधन लक्षात घेता मागील वर्षाप्रमाणे मेडीक्लेम योजना राबविण्यात यावी. तसेच त्यांचे शुल्क मागील वर्षाप्रमाणेच असेल. DSD

असाही ठराव करण्यात आला की, विभागाने केलेल्या निविदेला योग्य प्रतिसाद न मिळाल्याने Expersion of Interest मागविण्यात यावेत.

२) कुलगरूंनी सांगितले की, ठाणे, कल्याण, रत्नागिरी व झाराप येथील उपकेंद्रातील विविध अडचणी सोडविण्यासाठी व योग्य प्रकारे शैक्षणिक विकास घडविण्यासाठी केंद्रनिहाय सल्लागार समितीची स्थापना करण्यात येईल व त्यात प्राधिकरणातील सदस्यांचाही समावेश करण्यात येईल. सिंधु स्वाध्याय या प्रकल्पासाठी लवकरच सल्लागार समितीची स्थापना करण्यात येईल. समितीमध्ये प्राधिकरणातील सदस्यांचाही समावेश करण्यात येईल. Director Thane Kalyan Ratnagiri APD

३) श्री. दिपककुमार मुकादम यांनी एप्रिल २०१७ जमनालाल बजाज इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज मध्ये झालेल्या परीक्षांचे प्रमाणपत्र अद्याप विद्यार्थ्यांना मिळत नसल्याचा मुद्दा उपस्थित केला व सदर प्रकरण अत्यंत गंभीर असल्याचे सभागृहाच्या निर्दशनास आणले. सदर प्रश्न एक आठवडयात निकाली काढला जाईल, असे कुलगुरूंनी सभागृहास सांगितले. JBIMS BOEE

४) श्री. वैभव नरवडे यांनी खालील प्रश्न उपस्थित केले व त्यावर

लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी विनंती कुलगुरूंना केली.

(i) शंकर नारायण कला वाणिज्य महाविद्यालयात अजूनही १५ नैमित्तीक रजा देण्यात येत नाहीत. महाविद्यालयातील प्रा. अनुपमा गावडे यांचे वेतन, रजा शिल्लक असताना देखील प्राचार्यांनी कपात केले. त्या विरोधात त्यांनी तक्रार निवारण समितीकडे दाद मागितली. तो निर्णय देखील प्रा. अनुपमा गावडे यांच्या बाजूने लागला. तसेच व्यवस्थापन परिषदेच्या २७ फेब्रुवारी, २०१५ मध्ये देखील निर्णय प्रा. अनुपमा गावडे यांच्या बाजूने लागला आणि त्यांना कपात केलेले वेतन पुन्हा देण्याचा ठराव करण्यात आला तसे महाविद्यालयाच्या प्राचार्यांना कळविले गेले. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी सुनावणी मागितली असता पुन्हा व्यवस्थापन परिषदेसमोर प्रकरण सुनावणीस आले तेथे देखील प्राचार्य अनुपस्थित राहिले. त्यात देखील निर्णय प्रा. अनुपमा गावडे यांच्या बाजूने लागला व कपात केलेले वेतन सदर प्राध्यापिकेला देण्यासंदर्भात महाविद्यालयाच्या प्राचार्यांना दुसऱ्यांदा कळविण्यात आले. अजूनही त्याची अंमलबजावणी केलेली नाही. व्यवस्थापन परिषदेच्या ठरावाची अंमलबजावणी गेली दोन वर्ष महाविद्यालयाचे प्राचार्य करत नसतील तर प्रथम त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावावी. तरीही अंमलबजावणी न केल्यास त्यांचेवर कारवाई करण्यात यावी, असे डॉ. नरवडे यांनी सांगितले.

(ii) नैमित्तीक रजेसंदर्भात विद्यापीठाने वेळोवेळी स्मरणपत्र पाठविले आहे. तरीही एस.एम.शेट्टी महाविद्यालय, पवई या महाविद्यालयात देखील १५ नैमित्तीक रजा देण्यात येत नाहीत. शिक्षकांना नियमापेक्षा अधिक वर्कलोड दिले जातात. गेली ७ वर्ष प्राचार्य मात्र एकही वर्कलोड घेत नाही आदी संदर्भात महाविद्यालयाकडून खुलासा मागितला जावा त्यानंतर पुढील कारवाई करावी.

(iii) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. १६ ऑक्टोंबर, २०१८ रोजी जाहीर नोटीसद्वारे शिक्षकांसाठी Orientation/Refresher Courses दि. ३१ डिसेंबर, २०१८ पर्यंत वाढविली आहे. त्यावर विद्यापीठाने परिपत्रक काढून सर्व महाविद्यालयांना/शिक्षकांना अवगत

करावे.

(iv) Orientation/Refresher Courses साठी काही महाविद्यालये शिक्षकांना पाठवत नाहीत त्यामुळे शिक्षकांचे नाहक नुकसान होते तरी शिक्षकांना सदर कोर्सला जाणेसाठी विद्यापीठाने संलग्नीत महाविद्यालये आणि त्यांच्या प्राचार्यांना कडक समज देण्यात यावी.

(v) काही महाविद्यालयांमध्ये पेपर तपासणीसाठी एका दिवशी ४० पेपर तपासण्याचे बंधन घातले जाते हे अन्यायकारक आहे. पेपर तपासणी संदर्भात स्पष्टता असणे आवश्यक आहे तरी १००/८० मार्कांचा पेपर असल्यास एका दिवशी प्राध्यापकाने किती पेपर तपासावेत याविषयी परीक्षा विभागाने स्पष्ट निर्देश जारी करावेत व तसे सर्व महाविद्यालयांना कळवावे.

(vi) काही बोर्ड ऑफ स्टडीज च्या निवडणुका लागलेल्या आहेत परंतु दोन वर्ष होत आली अजूनही Adhoc बोर्डाच्या निवडणुका झालेल्या नाहीत. या संदर्भात विद्यापीठाने लवकरात-लवकर पावले उचलावीत व उर्वरित सर्व बोर्ड ऑफ स्टडीज पूर्ण कराव्यात.

(vii) शिक्षक तक्रार निवारण समिती समोर बऱ्याच प्राध्यापकांच्या तक्रारी विद्यापीठ स्तरावर गेल्या वर्षभरापासून प्रलंबित आहेत. शिक्षक तक्रार निवारण समिती अजूनही पूर्णपणे गठित झालेली नाही. तरी लवकरात-लवकर शिक्षक तक्रार निवारण समिती गठित करावी व सर्व प्रकरणे निकाली काढण्यासाठी समितीच्या बैठकींचे आयोजन करावे.

(viii) शासनाने शिक्षक भरतीला परवानगी दिलेली आहे. त्याचप्रमाणे तासिका तत्वावरील प्राध्यापकांचे मानधन देखील वाढविले आहे तसा शासन निर्णय देखील जाहीर झाला आहे. सदरचे शासन निर्णयाचे अवलंबन (adopt) करून संलग्नीत महाविद्यालयांना अंमलबजावणीसाठी कळविण्यात यावे.

(ix) CAG च्या अहवालाप्रमाणे विद्यापीठात ज्या काही अनियमितता झाल्या आहेत. त्या व्यवस्थापन परिषदेकडे आणल्यास विद्यापीठ म्हणून आपल्याला विचार करता येईल.

TAAS(CT)
BOEE
Election
Grievance Election
TAAS (CT)
F/A

५) श्री. सांगुर्डे यांनी महाविद्यालयातील कॅस बाबत विद्यापीठाची नेमकी काय भूमिका आहे ते स्पष्ट करण्याची विनंती कुलगुरूंना केली. महाविद्यालयातील शिक्षकांच्या कॅस बद्दल कुलगुरू म्हणाले की, कॅम्प घेण्यात अडचणी येत असल्यास महाविद्यालयांच्या स्तरावर मुलाखती घेण्यात याव्यात. ज्या ठिकाणी कॅम्प होऊ शकतील त्या ठिकाणी कॅम्प घेण्यात यावेत व जलद गतीने प्रक्रिया नियमानुसार पार पाडावी. TAAS (CT)

६) मा. कुलगुरूंनी सभागृहास सांगितले की, मुंबई विद्यापीठाच्या ठाणे उपकेंद्राच्या शैक्षणिक विकासासाठी ठाणे महापालिकेकडून २० कोटी रूपयांचा निधी दिला जाईल असे ठाणे महापालिकेचे आयुक्त संजीव जयस्वाल यांनी आश्वासन दिले. FIA CDU

याबाबत सदस्यांनी कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव व विद्यापीठ प्रशासनाचे अभिनंदन केले.

कुलसचिवांनी सर्व सदस्यांचे आभार मानून, अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहिर केले.

कुलगुरू

प्र कुलगुरू

कुलसचिव

* सदर इतिवृत्तात दि. १६ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत दुरुस्ती करण्यात आलेली आहे.

SKS

बाब क्र. २२
०६/१२/२०१८

परिशिष्ट - क

Statement showing the Fees for Panel Advocates of the University of Mumbai.

| Sr. No. | Particulars | Preivous Rates of Fees accepted by the Management Council (in Rs.) | Revised Rates of Fees accepted by the Management Council (in Rs.) |
|---|---|---|---|
| | In Civil Cases High Court (Original Side) Mumbai Nagpur and Aurangabad<br>**Long Cause Suits:** | | |
| 1 | (i) Brief to settle draft Plaint. | 900 → | 900 |
| | (ii) Brief to settle Written Statement | 900 → | 900 |
| | (iii) Brief to hearing & final disposal | 1650 → | 1650 |
| | (iv) Filing Caveat and other Misc.Applications | 2000 | 1000 |
| | (v) For formal appearance in a case, i.e. submitting to the orders of court in which no University's interest is involved. | 1000 | 1000 |
| | (vi) For filing applications for transefer of Cases from one court to another. | 1000 | 1000 |
| | (vii) Drafting of Notices and reply to Advocate's Notices. (Per Case) | 1000 | 1000 |
| 2 | **Writ Petitions:**<br>(i) Brief to settle draft petition. | 900 | 900 |
| | (ii) Brief to settle draft Affidavit (in case of junior drawing also) | 900 | 900 |
| | (iii) Brief for hearing and final disposal per day. | 1650 | 1650 |
| | (iv) Hearing of Notice of Admission per case. | 1200 | 1200 |
| | (v) Filing Caveat and other Misc. Applications. | 2000 | 1000 |
| | (vi) For formal appearance in a case, i.e. submitting to the orders of court in which no University's interest is involved. | 1000 | 1000 |
| | (vii) For filing applications for transfer of Cases from one court to another. | 1000 | 1000 |
| | (viii) Drafting of Notices and reply to Advocate's Notices. (Per case) | 1000 | 1000 |
| 3 | **Appeals in the High Court:**<br>(i) Brief to settle draft memorandum of Appeal (in case of Junior drawing also) | 900 | 900 |
| | (ii) Brief for hearing and Final disposal per day. | 1650 | 1650 |
| | (iii) Brief to settle petition for leave to appeal to the Supreme Court (in case of Jr. drawing also) | 900 | 900 |
| | (iv) Brief for hearing of Petition for leave to appeal to the Supreme Court (First five hours of hearing) | 900 | 900 |

| Sr. No. | Particulars | Preivous Rates of Fees accepted by the Management Council (in Rs.) | Revised Rates of Fees accepted by the Management Council (in Rs.) |
|---|---|---|---|
| 4 | **Interlocutory Proceedings:** (i) Brief to settle draft affidavit in reply to chamber summons of Notice of Motion. | 600 | 600 |
| | (ii) Brief for hearing of Chamber summons. | 1000 | 1000 |
| | (iii) Brief for hearing of Notice of Motion. | 900 | 900 |
| 5 | **In Civil Writ Petitions High Court (Appellate Side)** (i) Brief hearing of Petition, per day. | 2000 | 2000 |
| | (ii) Brief to oppose petition on admission of any petition or a petition for leave or application for interim stay or injunction. | 1650 | 1650 |
| | (iii) Brief to oppose petition, on admission (if the hearing Lasts for more than three hours) | 2000 | Nil |
| | (iv) (a) Brief to draw petition or any other pleading. | 1200 | 1200 |
| | (b) For Drafting Affidavit | 900 | 900 |
| | (c) Brief to draw petition for leave to appeal to the Supreme Court. | 900 | 900 |
| | (v) Brief for hearing of the petition for leave to appeal to the Supreme Court or to oppose the stay Application (if the hearing lasts for less than three hours.) | 1650 | 1650 |
| | (vi) Brief to draw statement of case in the Supreme Court. | 900 | 900 |
| | (vii) Brief for admission and leave petition. | 600 | 600 |
| | (viii) Brief to oppose petition on admission (if the hearing lasts for less than three hours.) | 1200 | 1200 |
| | (ix) Brief to oppose petition on admission (if the hearing lasts for more than three hours.) | 1200 | Nil |
| 6 | **Other High Courts.** (i) Drafting Affidavit in proceeding filed in other High Court. | 900 | 900 |
| | (ii) Drafting petition before other High Court. | 600 | 600 |
| 7 | **Mumbai University and College Tribunal:** (i) Settlement of drafts, petitions, affidavits, counter affidavits, Applications etc. | 500 | 500 |
| | (ii) Hearing of Notice of admission per Case. | 900 | Nil |
| | (iii) Brief for hearing and final disposal per day. | 1500 | 1500 |
| | (iv) Brief to oppose admission of any petition or petitions for leave for application for interim stay or injuction. | 1000 | 1000 |
| | (v) Adjournment without previous intimation. | 150 | 150 |
| | (vi) Drafting of Caveat. | 500 | 500 |
| | (vii) Group matters, one set of fees payable as per (ii) to (iv) above. | | |

| Sr. No. | Particulars | Preivous Rates of Fees accepted by the Management Council (in Rs.) | Revised Rates of Fees accepted by the Management Council (in Rs.) |
|---|---|---|---|
| 8 | **Arbitration Proceedings:**<br>(i) Brief to draw written statement or any other pleadings. | 900 | 900 |
| | (ii) To oppose application for interim injunction. | 1650 | 1650 |
| | (iii) Hearing and opposing Chamber summons for extension of time. | 900 | 900 |
| | (iv) Brief for hearing final disposal per day. | 2000 | 1500 |
| 9 | **City Civil Court:**<br>(i) Fees for opposing application. | 500 | 500 |
| | (ii) Filing appearance and submitting to the orders of the Court. | 300 | 300 |
| | (iii) Injunction. | 1000 | 1000 |
| | (iv) Drafting legal document conveyancing work | 1050 | 1050 |
| | (v) Legal advice to Government Officer. | 1200 | 1200 |
| | (vi) Proceedings for execution of Court's decrees or orders. | 2000 | 2000 |
| | (vii) Filing Caveat or other miscellaneous applications. | 1000 | 1000 |
| | (viii) Other suits | 2000 | 2000 |
| | (ix) Appeal against interlocutory orders | 2000 | 2000 |
| | (x) Appeal against final orders passed in a suit or other Proceedings. | 3000 | 3000 |
| 10 | **Labour Court:**<br>(i) Reply to the application. | 2000 | 2000 |
| | (ii) Effective hearing | 2000 | 2000 |
| | (iii) Non-effective hearing. | 1000 | 500 |
| | (iv) Cases where dispute involves general issues relating to Individual workers. | 2000 | Per Case |
| | (v) Cases where dispute involves general issues relating to one or more categories or workers. | 3000 | Per Case [illegible] |
| 11 | **Small Cause Court, Mumbai**<br>(i) Proceedings for execution of court's decrees or orders. | 3000 | 3000 |
| | (ii) Filing Caveat or other miscellaneous applications. | 1000 | 1000 |
| | (iii) Other suits. | 1000 | 1000 |
| | (iv) Appeal against interlocutory orders. | 3000 | ~~2000~~ 3000 |
| | (v) Appeal against final orders passed in a suit or other proceedings. | 3000 | 3000 |
| 12 | **Consumer Forum, Consumer Commission.** | 2000 lump sum | 2000 lumpsum |